Annexure-III

# Maharashtra University of Health Sciences, Nashik

## Physiotherapy Faculty

### Trust Deed / Bylaws / Registration Certificate

### Registration Certificate (Trust / Hospital (Bombay Nursing Act))

**Name of College/Institute: Br Nath Pai College of Physiotherapy, Kudal**

| | | |
|---|---|---|
| Name of Trust / Society | : | **Br Nath Pai Shikshan Sanstha ,Sindhudurg** |
| Registration Certificate | : | **Trust / Society :- F-2072**<br>**Hospital (Bombay Nursing Act) :- NA** |
| Name of the College / Institute (As per First Affiliation letter) | : | **Br. Nath Pai College of Physiotherapy, Kudal** |
| Address | : | **Br. Nath Pai Shaikshanik Bhavan, MIDC, Plot No. 4, Tal. Kudal, Dist. Sindhudurg, Pin Code- 416550** |
| Email ID | : | **bnpcop@gmail.com** |
| Telephone / Mobile No.(s) | : | **02362-222889** |
| Website | : | **www.bnpcop.com** |
| College Code | : | **161116 (6155)** |

Br. Nath Pai College of Physiotherapy, Kudal ★ MUHS COLLEGE CODE 161116

Dean/ Principal Stamp & Signature

Dean/Principal
Br. Nath Pai College of Physiotherapy, Kudal

**Verified by The LIC Committee Members**

विशेष-अ.जा./मु. स्था. वि./५० म.

क्रमांक

# नोंदणी प्रमाणपत्र

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०**

**(१८६० चा अधिनियम २१)**

नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/९०१८/सिंधुदुर्ग

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की बॅ. नाथ पै शिक्षण संस्था सिंधुदुर्ग, कुडाळ, ता. कुडाळ.

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरीत्या नोंदणी करण्यात आली.

तारीख 3-9-2003 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

[signature] 3-9-2003
सहाय्यक संस्था निबंधक
संस्थांचे सहायक निबंधक
सिंधुदुर्ग विभाग सिंधुदुर्ग
विभाग

[विशेष-ध.अ./मुं.सा.वि./२म.

072

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम २९) या अन्वये सिंधुदुर्ग विभाग येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव : बॅ. नाथ पै. शिक्षण संस्था, सिंधुदुर्ग ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ई-२०८२ सिंधुदुर्ग

अध्यक्ष यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक ८/८/०३ १९९ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही सहाय्यक धर्मादाय आयुक्त

पदनाम सिंधुदुर्ग विभाग सिंधुदुर्ग

पक्षकाराची अर्ज दाखल तारीख
नक्कल तयार झालेची तारीख
नक्कल दिलेची तारीख
26/10/2023

दिनांक २२/०४/२०२३ च्या कार्यकारिणीच्या सभेत व दिनांक १४/०५/२०२३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दिनांक १५/०६/२०२३ च्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजुर केलेले सुधारित नियम व नियमावली सुधारित मेमोरेंडम ऑफ असोसिएशन (ज्ञापन)

चौकशी क्रमांक 1268/23
निशाणी क्रमांक - 93

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

परिशिष्ट 'ब'
ज्ञापन
(मेमोरँडम ऑफ असोसिएशन)

## "बॅ. नाथ पै शिक्षण संस्था सिंधुदुर्ग" तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग या संस्थेचे सुधारित ज्ञापन (मेमोरँडम ऑफ असोसिएशन) (ज्ञापनपत्र)

१) संस्थेचे नाव : - **बॅ. नाथ पै शिक्षण संस्था, सिंधुदुर्ग, कुडाळ**

२) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता:- बॅ. नाथ पै शैक्षणिक भवन, प्लॉट नं. ४, एम.आय.डी.सी. पिंगुळी, कुडाळ, तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग

३) संस्थेचे उद्देश :-

१. युवक- युवती मध्ये व्यक्तीमत्व विकास घडवून आणण्यासाठी विविध शैक्षणिक व क्रिडाविषयक उपक्रम राबविणे. त्यामध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, तसेच इ. पहीली ते बारावी पर्यंतची सी.बी.एस.ई बोर्डाची इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणे.

२. राज्य मंडळाची इ.पहिली ते बारावी.पर्यंतची इंग्रजी व मराठी माध्यमांची शाळा व सैनिकी शाळा सुरु करणे.

३. राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय (NIOS) या बोर्डाचे संलग्नीकरण घेऊन त्यात अंतर्भुत असणारे विविध अभ्यासक्रम सुरु करणे.

४. मुंबई विद्यापीठाच्या अधिपत्याखाली येणारे सर्व अभ्यासक्रम सुरु करणे. उदा. B.A / B.Com / B.Sc महाविद्यालय, B.A / B.Com / B. Sc महिला महाविद्यालय, B.A / B.Com / B. Sc रात्र महाविद्यालय, बी.एड, एम एड, विधी महाविद्यालय सुरु करणे. शारीरिक शिक्षण देण्यासाठी बी.पी.एड, एम.पी.एड विद्यालय, फाईन आर्ट महाविद्यालय, सर्व प्रकारची मॅनेजमेंट कॉलेजेस सुरु करणे, टुरिझम मॅनेजमेंट कॉलेज, अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करणे.

५. एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या अधिपत्याखाली येणारे सर्व अभ्यासक्रम सुरु करणे. उदा. B.A/ B.Com/B. Sc महाविद्यालये, बी.एड, एम एड, विधी महाविद्यालय, तांत्रिक, शिक्षण महाविद्यालय सुरु करणे.,

६. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांच्या अधिपत्याखाली येणारे सर्व अभ्यासक्रम सुरु करणे.

७. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या अधिपत्याखाली येणारे सर्व अभ्यासक्रम सुरु करणे. उदा. B. Lib, M. Lib, बी. ए., बी. कॉम मराठी पत्रकारिता कोर्स सुरु करणे तसेच लहान मुलांसाठी 'हसत खेळत शिक्षण' प्रकल्प राबविणे.

८. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अंतर्गत असणारे पदवी, पदविका, पदव्युत्तर. फेलोशिप हे सर्व अभ्यासक्रम सुरु करणे. एम.बी.बी.एस, बी.डी.एस, युनानी, नी.ए.एमएस, बीएचएमएस, बीपीटीएच, बीएएसएलपी, बीओटीएच, बीपीएमटी, बी एस्सी ऑप्टोमेट्री, बी एस्सी नर्सिंग, पोस्ट बेसिक बी एससी नर्सिंग ही वैद्यकीय क्षेत्रातील महाविद्यालये तसेच एम.डी, एम.एस, (फॅकल्टी ऑफ मेडीसीन), एम.डी आयुर्वेद,एम.डी होमीओपॅथी, एम.एस्सी ऑप्टोमेट्री, एम.पी.टी.एच, एम.ओ.टी.एच, एम.एससी नर्सिंग, योग, नॅचरोपॅथी, एम.ए.एस.एल.पी, एम.पी.ओ, डी.एम.एल.टी महाविद्यालये सुरु करणे, डी. फार्म, बी.फार्म, एम.फार्म महाविद्यालय, होम सायन्स (गृहविज्ञान शास्त्र) सुरु करणे.

९. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्या अधिपत्याखाली येणारे सर्व पदवी, पदवीका व पदव्युत्तर उदा. बी.एस्सी अॅग्री, एम.एस्सी अॅग्री इत्यादी अभ्यासक्रम सुरु करणे.

१०. महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई व महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या अंतर्गत असणारे सर्व अभ्यासक्रम सुरु करणे. उदा. ANM, GNM व तत्सम नर्सिंग पदविका अभ्यासक्रम सुरु करणे.

११. कार्यक्षेत्रातील युवक युवतींना स्पर्धात्मक परीक्षांबाबत मार्गदर्शन करणे, त्यासाठी तज्ञांची व्याख्याने, मेळावे, प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेणे, स्वयंरोजगार, लघु उद्योग, शासकीय सेवेसाठीच्या स्पर्धा परीक्षा, सैन्य भरती यासाठी मार्गदर्शन केंद्र सुरु करणे, टंकलेखन, लघुलेखन, संगणक, शिवणकला, हस्तकला, आदी प्रशिक्षणांचे छोटे कोर्सेस सुरु करणे.

१२. जनतेचे आरोग्य चांगले व निरोगी राहण्यासाठी आरोग्य शिबिरे, रक्तगट चाचणी, रक्तदान शिबिरे यांचे आयोजन करणे, संस्थेच्या अंतर्गत रक्तपेढी सुरु करणे, गरीब व निराधार व्यक्तींना वैद्यकीय मदत करणे, रुग्ण वाहिकेची सोय करणे तसेच नैसर्गिक आपद्ग्रस्तांना मदत करणे. योग प्रचार व प्रसार करणे, योग शिक्षण देणे, योग केंद्र सुरु करणे.

१३. सामाजिक समता, बंधुभाव, अन्याय निवारण्याचे कार्य करणे, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करणे, हुंडाबंदी, पर्यावरण संतुलन, प्रौढ साक्षरता, सामाजिक वनीकरण आदी कल्याणकारी योजना राबविणे, सार्वजनिक मोफत वाचनालय सुरु करणे.

१४. सर्व प्रकारचे राष्ट्रीय व धार्मिक सण साजरे करणे.

१५. औद्योगिक क्षेत्रातील मागासवर्गीय महिलांसाठी वसतीगृह व इतर महिलांसाठी वसतीगृह सुरु करणे तसेच विद्यार्थी -विद्यार्थिनींसाठी वसतीगृह सुरु करणे.

१६. संस्थेचे स्वत:चे किमान 300 खाटांचे रुग्णालय सुरु करणे. त्यामध्ये सर्व सोई सुविधा उपलब्ध करुन देणे. त्या शिवाय जिल्हयातील किंवा जिल्हयाबाहेरील बंद असलेली रुग्णालये भाडेतत्वावर घेणे किंवा खरेदी करुन त्यातून आरोग्यसेवेचे कार्य करणे. फिरता दवाखाना सेवा देणे.

१७. महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने समाजातील अंध, मुकबधीर, मतीमंद अशा मुलांसाठी शाळा सुरु करणे तसेच त्यांच्या निवासाची (वसतीगृहाची) सोय करणे.

१८. महाराष्ट्र शासनाच्या तसेच केंद्र शासनाच्या वेगवेगळ्या योजनेमध्ये तसेच शैक्षणिक क्षेत्रातील योजनेमध्ये भाग घेऊन त्या राबविणे व त्या माध्यमातून बेरोजगारांना रोजगार देण्याच्या दृष्टीने कार्य करणे.

१९. संस्थेचे सर्व शैक्षणिक उपक्रम एकाच संकुलात सुरु करण्याच्या दृष्टिकोनातून शैक्षणिक संकुल उभारणे.

२०. केंद्र शासनाच्या जनऔषधी परियोजना अंतर्गत जनऔषधी केंद्र सुरु करुन सामान्य जनतेचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करणे.

२१. राज्य शासनामार्फत मान्यता घेऊन महिला समुपदेशन केंद्र सुरु करणे.

२२. कौशल्य विकास आणि उद्यमशिलता मंत्रालय (NSDC) यांच्यातर्फे राबविण्यात येणारे सर्व अभ्यासक्रम सुरु करणे.

२३. केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या योजनेतील कोणत्याही कल्याणकारी प्रकल्पासाठी पालक संस्था/अंमलबजावणी संस्था म्हणून काम करणे.

२४. शासन मान्यतेने मोबाईल मेडिकल युनिट द्वारे गावागावात वैद्यकीय सेवा पुरविणे.

२५. अवर्षण, पुर, भुकंप तत्सम स्वरुपाच्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी आपत्तीग्रस्तांना मदत करणे व शासनाच्या उपक्रमांना सहकार्य करणे व प्रत्यक्ष सहभाग देणे, तत्सम स्वरुपाच्या समाजोपयोगी योजनांचा प्रसार करणे व त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे.

२६. या संस्थेमार्फत मुला, मुलींमध्ये साहसी वृत्ती निर्माण होण्यासाठी साहसी उपक्रम आयोजित करणे. शासनाच्या योजनेतून किंवा न्यासाच्या निधीतून व्यायाम शाळा सुरु करणे, योगाचे वर्ग चालविणे, योग शिबीरे आयोजित करणे.

२७. आज समाज व्यवस्था बदलत जात असल्याने कुटुंबाचे विघटन झपाटयाने होत आहे. त्यामुळे वयोवृध्द बुजुर्ग रस्त्यावर येत आहेत त्यांची स्थिती वैफल्यग्रस्त होत आहे. अशा वेळी आजच्या नवीन पिढीवर वयोवृध्दांबद्दल आदराची भावना निर्माण होण्यासाठी समाज प्रबोधनाची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी या संस्थेमार्फत शाळा, कॉलेज मधून मार्गदर्शन करणे.

२८. राष्ट्रपुरुष तसेच बॅ. नाथ पै, प्रा.मधु दंडवते, मधु लिमये, साने गुरुजी, एस.एम जोशी, आरती प्रभू, कै. एकनाथ ठाकूर, कै. पुष्पसेन सावंत, कै. बापू नेरुरकर, कै. सिध्देश गाळवणकर तसेच इतर समाजवादी, सामाजिक व शैक्षणिक व्यक्तींच्या नावे समाजात विविध क्षेत्रात काम करणा-या व्यक्तींना पुरस्कार देणे, संस्थेच्यावतीने इतर शैक्षणिक, सामाजिक संस्थांना पुरस्कार देणे.

२९. राज्य शासनाच्या राज्यनाट्य स्पर्धेत भाग घेणे, केंद्र शासनाच्या नाट्यस्पर्धेत भाग घेणे, शाळेच्या व संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांचा संघ स्पर्धेत उतरविणे. तसेच शासनाच्या बालनाटय स्पर्धेत भाग घेणे व बालनाटय स्पर्धा भरविणे.

३०. भारतातील व भारताबाहेरील विद्यापीठांच्या / संस्थांच्या सहकार्याने निरनिराळे शैक्षणिक अभ्यासक्रम सुरु करणे व चालविणे त्याचप्रमाणे अभिमत विद्यापीठ (Deemed to be University) स्थापन करणे.

३१. भारत सरकार, भारतातील संघराज्य सरकार, राज्य सरकार यांचे सोबत मिळून तसेच, आवश्यकतेनुसार त्यांची मान्यता घेऊन त्यांच्या सहकार्याने विविध शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक उपक्रम तसेच त्याबाबतचे अभ्यासक्रम सुरु करणे.

३२. या उद्देशामध्ये समाविष्ट नसलेले, परंतु समाजोपयोगी व या न्यासाच्या ध्येय धोरणांशी निगडित काही उपक्रम राबविण्याचे झाल्यास ते त्या त्या वेळी न्यासाच्या कार्यकारणीच्या सभेत निर्णय घेऊन उपक्रम राबविण्यात येतील.

| अ.क्र. | संपूर्ण नाव | वय | हुद्दा | पत्ता | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. उमेश सुंदर गाळवणकर | ४६ | चेअरमन | प्लॅट नं टी.४१, तीसरा मजला, सी विंग, रवळनाथ प्लाझा, मु.पो. पिंगुळी ता.कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२० | नोकरी | भारतीय |
| २) | श्रीम. अदिति रामकृष्ण खानोलकर | ४६ | सचिव | प्लॅट नं ०४, कलश उद्यान, बुलबुल ३,सेक्ट्र ११, कोपरखैरणे, नवी मुंबई, जि.ठाणे ४०० ७०९ | नोकरी | भारतीय |
| ३) | श्री. अभिजीत पंडीतराव देशमुख | ५४ | खजिनदार | गुरु सावंत निवास, ओंकार नगर, एम.आय.डी.सी एरीया,कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५५० | व्यवसाय | भारतीय |
| ४) | श्रीम. अदिती शैलेंद्र पै | ४३ | सदस्य | सी/१४/१०८, एम.आय.जी कॉलनी भारत को ऑप बँकेसमोर, कलानगर, वांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१ | व्यवसाय | भारतीय |
| ५) | डॉ. संजय गणेश निगुडकर | ६० | सदस्य | हिंदू कॉलनी मु.पो.कुडाळ, ता.कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२० | व्यवसाय | भारतीय |
| ६) | डॉ. संजीव झिलू आकेरकर | ५५ | सदस्य | हिंदू कॉलनी मु.पो. कुडाळ ता.कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२० | व्यवसाय | भारतीय |
| ७) | श्री. कुमार देवराव कदम | ७५ | सदस्य | २१०१, पिनॅकल, जमनाराम को ऑप हौ. सो. लि, राहुल टॉवर समोर, कदमपाडा, डॉ. राजेंद्र प्रसाद रोड. मुलुंड (प) मुंबई ४०००८० | व्यवसाय | भारतीय |
| ८) | श्रीम. शैलेजा शशीशेखर प्रभूर्तेडोलकर | ५१ | सदस्य | रामेश्वर मंदिराजवळ, मु.पो. आकेरी ता.कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१० | शेती | भारतीय |
| ९) | श्री. दिपक मदन नाईक | ४५ | सदस्य | साई श्रध्दा अपार्टमेंट, बी विंग, दुसरा माळा, बीएसटी बस डेपो ज. ;, टागोरनगर, विक्रोळी, (पु) मुंबई ४०० ०८३ | नोकरी | भारतीय |
| १०) | श्री. मिलींद मधुकर प्रभू | ४८ | सदस्य | ए- १०२, श्री नाना महाराज को ऑप हौ. सोसायटी, हिरा नागू जोशी मार्ग, कोपर क्रॉस रोड, शांती नगर, डोंबिवली (प), ता कल्याण, जि. ठाणे ४२१२०२ | नोकरी | भारतीय |
| ११) | श्री. विजयकुमार रामचंद्र सावंत | ५६ | सदस्य | घर नं. २०६४, धुरीटेंबनगर मुंबई गोवा हायवे साई मंदीर समोर मु.पो.पिंगुळी ता.कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२८ | नोकरी | भारतीय |

३३. आम्ही खाली सहया करणारे "बॅ. नाथ पै शिक्षण संस्था, सिंधुदुर्ग" ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग या मंडळाच्या पहील्या कार्यकारी मंडळाचे सभासद जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम (१८६०) अन्वये अभिप्रेत केलेली मंडळ अस्तित्वास आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून " बॅ.नाथ पै शिक्षण संस्था, सिंधुदुर्ग" ता. कुडाळ जि.सिंधुदुर्ग ही संस्था दिनांक १०/११/२००२ रोजी स्थापन केली असून ते संस्था नोंदणी अधिनीयम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही विज्ञापनावर सहया केल्या आहेत.

| अ.क्र | संपूर्ण नाव | हुद्दा | पत्ता | सही |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. उमेश सुंदर गाळवणकर | चेअरमन | प्लॅट नं टी ४१, तीसरा मजला, सी विंग, रवळनाथ प्लाझा, मु.पो. पिंगुळी ता.कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२० | Galvankar |
| २) | श्रीम. अदिती रामकृष्ण खानोलकर | सचिव | प्लॅट नं ०४, कलश उद्यान, बुलबुल ३,सेक्ट्र ११, कोपरखैरणे, नवी मुंबई, जि.ठाणे ४०० ७०९ | [signature] |
| ३) | श्री. अभिजीत पंडीतराव देशमुख | खजिनदार | गुरु सावंत निवास, ओंकार नगर, एम.आय.डी.सी एरीया,कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५५० | Deshmukh |
| ४) | श्रीम. अदिती शैलेंद्र पै | सदस्य | सी/१४/१०८, एम.आय.जी कॉलनी भारत को ऑप बँकेसमोर, कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१ | [signature] |
| ५) | डॉ. संजय गणेश निगुडकर | सदस्य | हिंदू कॉलनी मु.पो.कुडाळ, ता.कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२० | [signature] |
| ६) | डॉ. संजीव झिलू आकेरकर | सदस्य | हिंदू कॉलनी मु.पो. कुडाळ ता.कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२० | [signature] |
| ७) | श्री. कुमार देवराव कदम | सदस्य | २१०१, पिनॅकल, जमनाराम को ऑप हौ. सो. लि, राहुल टॉवर समोर, कदमपाडा, डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, मुलुंड (प) मुंबई ४०००८० | Kumar Kadam |
| ८) | श्रीम. शैलेजा शशीशेखर प्रभूतेंडोलकर | सदस्य | रामेश्वर मंदिराजवळ, मु.पो. आकेरी, ता.कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१० | शैलजा प्रभूतेंडोलकर |
| ९) | श्री. दिपक मदन नाईक | सदस्य | साई श्रध्दा अपार्टमेंट, बी विंग, दुसरा माळा, बीएसटी बस डेपो मागे, टागोरनगर, विक्रोळी, (पु) मुंबई ४०० ०८३ | DNaik |
| १०) | श्री. मिलींद मधुकर प्रभू | सदस्य | ए- १०२, श्री नाना महाराज को ऑप हौ. सोसायटी, हिरा नागू जोशी मार्ग, कोपर क्रॉस रोड, शांती नगर, डोंबिवली (प), ता कल्याण, जि. ठाणे ४२१२०२ | MMPrabhu |
| ११) | श्री. विजयकुमार रामचंद्र सावंत | सदस्य | घर नं. २०६४, धुरीटेंबनगर मुंबई गोवा हायवे साई मंदीर समोर मु.पो.पिंगुळी ता.कुडाळ जि. सिंधुदुर्ग ४१६ ५२८ | [signature] |

खरी प्रत

तपासलेली
G.B.Kadam
वाचले 20/10/2023

[signature] 20/10/2023
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

...साठी अर्ज दाखल तारीख
... तयार झालेची तारीख
... दिलेची तारीख
26|10|2023

दिनांक २२/०४/२०२३ च्या कार्यकारिणीच्या सभेत व दिनांक १४/०५/२०२३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दिनांक १५/०६/२०२३ च्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजुर केलेली सुधारित नियम व नियमावली

चौकशी क्रमांक ७।६।८।२३
निशाणी क्रमांक - ९८

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

परिशिष्ट 'क'

## "बॅ.नाथ पै शिक्षण संस्था सिंधुदुर्ग" ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग या संस्थेचे नियम व नियमावली

संस्था नोंदणी क्रमांक व दिनांक एफ-२०७२ दिनांक: ०७/०७/२००३ (सुधारीत घटना नियम १ नुसार सुधारीत प्रत)

### १. नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या:-

१. संस्था/संघ :-

संस्था/संघ म्हणजे बॅ.नाथ पै शिक्षण संस्था, सिंधुदुर्ग, ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग ही होय. या नियम व नियमयावलीत याचा उल्लेख संस्था या शब्दाने केला आहे.

२. कार्यकारी मंडळ:-

संस्थेच्या नियम व नियमावली प्रमाणे संस्थेचा सर्व कारभार व्यवस्थितरित्या चालविणेसाठी संस्थेच्या सर्व सभासदांनी सर्वसाधारण सभेत ठराविक कालावधीसाठी ज्या व्यक्तीची निवड केली असेल अशा जबाबदार व्यक्तींचा समूह होय.

३. सभा:-

सभा म्हणजे संस्थेचे ध्येय व धोरण तसेच उद्देश पार पाडणेसाठी संस्थेच्या सभासदांशी विचार विनिमय करुन निर्णय घेण्यासाठी बोलविण्यात आलेली बैठक होय.

### २. कार्यक्षेत्र:-

या संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारत देश असे राहील.

### ३. हिशोबाचे वर्ष:-

१ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

### ४. सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत:-

संस्थेचे ध्येय, धोरण व उद्देश मान्य असणा-या १८ वर्षावरील व्यक्तीस संस्थेचे सभासद होण्यासाठी संस्थेच्या दोन विश्वस्तांच्या शिफारशीने अर्ज केल्यानंतर संस्थेच्या विश्वस्त मंडळाच्या सभेत बहुमताने मान्यता दिल्यानंतर अशा व्यक्तीस या संस्थेचे सभासद करुन घेता येईल. मात्र त्यासाठी त्याने नियमाप्रमाणे वर्गणीची रक्कम भरणा करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याने मंडळाकडे सभासदत्वाचा अर्ज मंजूरी करीता दिला पाहीजे. अर्जास मंजुरी मिळाल्यानंतरच अर्जदाराला सभासदत्वाचे अधिकार प्राप्त होतील. अशा व्यक्तीचे सभासदत्व विश्वस्त मंडळाच्या सभेत नाकारल्यास अशा व्यक्तीस कोणतीही तक्रार करता येणार नाही. मात्र याबाबतचा अंतिम निर्णय मा. चेअरमन (संस्थापक अध्यक्ष) यांना राहील. तो निर्णय विश्वस्त मंडळास मान्य राहील.

### ५. सभासदांचे प्रकार:-

अ) संस्थापक सभासद:-

संस्थेच्या स्थापनेच्या वेळी जे समासद होते व ज्यांनी सामान्य सभासद वर्गणी रु.१००/- भरली आहे अशांना 'संस्थापक सभासद' समजले जाईल.

आ) आजीव सभासद:-

ज्या सभासदाने प्रवेश फी रु.१००/- व एकदाच एक रक्कमी रु २५,०००/- भरणा केली आहे अशा सभासदास आजीव सभासद समजण्यात येईल.

चेअरमन    सचिव    खजिनदार

## ६. सभासदत्व रदद होणे:-

१. सभासदांची वर्तवणूक/वागणूक संस्थेच्या कार्यास घातक ठरत असेल ज्ञान व नियमावलीतील तरतुदीचे उल्लंघन करीत असेल, निर्घुण कृत्य केल्यास, संस्थेस हानी अथवा नुकसान होईल, अप्रतिष्ठा, दुर्लोकीक होण्यास कारणीभूत ठरेल असे कृत्य केल्यास अशा सभासदांचे सभासदत्व रदद करण्यात येईल. अफरातफर अथवा संस्थेची फसवणूक केल्यास, संस्थेविषयी अपप्रचार केल्यास अथवा संस्थेस दोष लागेल असे कृत्य केल्यास अशा सभासदांचे सभासदत्व रदद करण्यांत येईल.

२. फौजदारी खटल्यांत दोषी ठरवून कायदेशीर शिक्षेस पात्र ठरल्यास, कायद्यानुसार दिवाळखोर सिध्द झाल्यास सभासदत्व रदद करण्यात येईल.

३. संस्थेने काम करण्यांस कायदेशीर अपात्र ठरविले असल्यांस, लेखी स्वरुपात राजीनामा दिलेला असेल आणि राजीनामा मंजुर झाला असेल तर सभासदत्व रदद करण्यात येईल.

४. वैद्यकीय, शारिरीक किंवा मानसिकदृष्ट्या संस्थेचे काम करण्यांस असमर्थ असल्यांस मृत्यु अथवा अन्य कारणाने सभासदत्व रदद करण्याबाबतचे निर्णय कार्यकारी मंडळ बहुमताने घेईल.

५. सभासदाचे वास्तव्य भारताबाहेर ६ महिन्या पेक्षा जास्त दिवस असल्यास त्याचे नियमाप्रमाणे सभासदत्व रदद होईल.

## ७. वार्षिक सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार आणि कार्ये:

वार्षिक सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व अंतिम निर्णय देणारी सभा समजली जाईल ही सभा आर्थिक वर्ष संपल्यानंतर चार महिन्याच्या आत घेण्यात येईल. या सभेत सर्व प्रकारचे विद्यमान सभासद भाग घेऊ शकतील. सभेचे स्थळ, दिनांक, वेळ याबाबतची सुचना १५ दिवस अगोदर सर्व सभासदांना देणे आवश्यक असेल.

१. सभेचे मागील इतिवृत्त वाचुन कायम करणे/मान्यता देणे.
२. वार्षिक हिशोब /जमाखर्च मंजुर करणे.
३. पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
४. कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ संपलेला असल्यास कार्यकारी मंडळाची निवड करणे.
५. सनदी लेखापाल / प्रमाणित लेखापाल व अंतर्गत हिशोब तपासणीस यांची नेमणूक करणे.
६. संस्थेच्या ध्येय धोरणाबाबत चर्चा करणे.
७. आयत्या वेळी येणारे विषय मान. चेअरमन यांच्या परवानगीने चर्चेला घेणे व त्यावर निर्णय देणे.

## ८. सर्वसाधारण सभा, सूचना व गणसंख्या:

वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभा याकरीता सभेचे स्थळ, दिनांक, वेळ, गणसंख्या, अजेंडा याबाबतची सुचना सर्वांना सभेच्या किमान १५ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सभेची सुचना किमान १५ दिवस अगोदर मान. चेअरमन यांच्या संमत्तीने सचिव यांनी सर्व प्रकारच्या सभासदांना देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये वरील प्रमाणे माहिती तसेच सभेत पुढील विषय नमूद करावेत. सभेची सुचना हस्ते देय किंवा रजिस्टर टपालाद्वारे किंवा दैनिक वृत्तपत्राद्वारे जाहिर प्रसिध्दीने देता येईल. मात्र वृत्तपत्रात सुचना देणे हे बंधनकारक असणार नाही तसेच ई-मेल, व्हॉट्सअप या माध्यमाद्वारे सभेचे निमंत्रण देता येईल. एकूण सभासद संख्येच्या १/३ एवढे सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पुर्ण झाली असे समजण्यात येईल. पुरेशी गणसंख्या न जमल्यासम तहकुब/स्थगित सभेला पुन्हा गणसंख्येचे बंधन राहणार नाही. पुरेशा गणसंख्येअभावी स्थगित सभा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यांत येईल. मात्र अशा सभेमध्ये घेण्यांत आलेला निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल.

चेअरमन | सचिव | खजिनदार

## ९. विशेष सर्वसाधारण सभा व तिची कामे:-

जी कार्ये वार्षिक सर्वसाधारण सभा करु शकते अशी सर्व कार्ये करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेस आहेत. अशी विशेष सर्वसाधारण सभा आवश्यकतेनुसार केव्हांही घेता येईल. संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा मान.चेअरमन यांच्या संमत्तीने कार्यकारी मंडळ आयोजित करेल किंवा सभासद संख्येच्या ३/५ सभासदांनी कार्यकारी मंडळाकडे लेखी मागणी केल्यास कार्यकारी मंडळाने तशी मागणी मिळाले पासून ३० दिवसांचे आत विशेष सर्वसाधारण सभा बोलवतील/आयोजित करतील. विशेष सर्वसाधारण सभेसाठी मतदानाचा हक्क असलेल्या एकूण ३/५ सभासदांची गणसंख्या असेल. सूचनेमध्ये वरील प्रमाणे माहिती तसेच सभेपुढील विषय नमूद करावेत. पुरेशी गणसंख्या न जमल्यास सदर सभा तहकूब अथवा स्थगित करण्यासाठी पुन्हा गणसंख्येचे बंधन राहणार नाही. पुरेशी गणसंख्ये अभावी स्थगित सभा पुन्हा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यांत येईल. मात्र अशा सभेत घेण्यांत आलेला निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल.

## १०.संस्थेचे कार्यकारी मंडळ व त्याची रचना:-

संस्थेचे व्यवस्थापन पाहणेसाठी कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १५ जणांचे कार्यकारी मंडळ/विश्वस्त मंडळ असेल. त्यांची रचना पुढीलप्रमाणे राहिल. चेअरमन-१, सचिव-१ खजिनदार-१ व इतर सर्व सदस्य असतील.

## ११. कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत:-

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा ५ वर्षांचा राहील. कार्यकारी मंडळाची निवड बहुमताने, हात वर करुन किंवा गुप्त मतदान पध्दतीने वार्षीक अथवा विशेष सर्वसाधारण सभेत सर्व सभासदामधुन करण्यात येईल. गुप्त मतदान पध्दतीने कार्यकारी मंडळाची निवड करावयाची असल्यास निवडणूक अधिकारी कार्यकारी मंडळाने नेमून निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. निवडणुक अधिकारी हे मान.चेअरमन किंवा कार्यकारी मंडळाणे नेमून दिलेले सभासद असतील.

## १२.कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये:-

### अ) चेअरमन

१. संस्थेच्या सर्व सभांचे चेअरमन यांनी अध्यक्ष स्थान भूषवावे व नियंत्रण करावे.
२. संस्थेच्या सर्व सभांचे कामकाज नियम व नियमावलीनुसार संस्था हितार्थ चालवणे.
३. संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या विविध समित्यांवर नियंत्रण ठेवणे.
४. संस्थेच्या वतीने रकमेची देवाणघेवाण करणे.
५. संस्था हितार्थ विविध करार करणे. तसेच शैक्षणिक धोरण ठरविणे व त्यानुसार शैक्षणिक विभागामध्ये आवश्यक ती विविध कार्यकारी पदे निर्माण करणे.
६. सभासदांचा राजीनामा मंजुर करणेबाबतचा अंतीम अधिकार मान.चेअरमन यांना राहील.
७. मतांची बरोबरी झाल्यास जास्तीचे मत/निर्णायक मत देण्याचा अधिकार बजावणे.
८. संस्था हितार्थ सर्व अंतिम अधिकार मान.चेअरमन यांना असतील.
९. संस्थेच्या विविध उपक्रमांसाठी कर्मचा-यांची विविध पदांवर नेमणुक करणे व पदोन्नती करणे. सेवेतून कमी करणे, संस्थेच्या कर्मचा-यांसाठी नियम तयार करणे व त्यांचेवर लक्ष ठेवणे. तसेच संस्थेचे कोर्टकचेरीचे कामकाज पाहणे अथवा प्रतिनिधींची नेमणूक करणे.

चेअरमन | सचिव | खजिनदार

## ब) सचिव:-

१) सचिव यांनी चेअरमन यांच्या आदेशांचे पालन करावे.
२) संस्थेच्या सर्व सभा आयोजीत करणे. तसेच प्रत्येक सभेचे इतिवृत्त नोंदवही मध्ये सुवाच्च अक्षरांत सुस्पष्ट लिहावे व पुढील सभेत ते वाचून दाखवावे.
३) संस्थेच्या नांवे सर्व अधिकृत पत्रव्यवहार करावा.
४) विविध कार्यसूची तयार करावी.
५) संस्थेच्या वतीने रक्कमेची देवाण-घेवाण करणे. आवश्यकतेनुसार चेअरमन यांच्या लेखी परवानगीने संस्थेची रु.२५,०००/- पर्यंतची रक्कम आकस्मिक खर्चासाठी आपल्या हाती ठेवावी.
६) वार्षिक हिशोबपत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके, महत्वाचे अहवाल वेळोवेळी तयार करुन घेणे व संबंधित विभागांकडे विहीत वेळेत सादर करणे.
७) कार्यकारी मंडळाचे संमत्तीने किरकोळ नियम तयार करणे.
८) संस्थेच्या मोठया खर्चाची बिले मंजुर करणे, मालमत्तेची देखरेख करणे.
९) संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे

## क) खजिनदार:

१) खजिनदार यांनी मान. चेअरमन यांच्या आदेशांचे पालन करावे.
२) वार्षिक हिशोबपत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके तयार करणे.
३) संस्थेच्या खर्चाची बिले मंजुर करणे. पावत्यांवर सहया करणे. मालमत्तेची देखरेख करणे. मोठया खर्चाची बिले सचिव यांच्या संयुक्त सहीने मंजुर करणे, संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.
४) संस्थेच्या जमाखर्चाचे हिशोब ठेवणे व त्यासंबंधीच्या नोंदवहया सुस्थितित ठेवणे.
५) संस्थेच्या नावे जमा झालेल्या रक्कमेपैकी जास्तीत जास्त रक्कम त्याच दिवशी सायंकाळपर्यंत अथवा दुसरे दिवशी सकाळी संस्थेच्या नांवे असलेल्या बँक खात्यात जमा करणे.
६) सभासदांची सूची तयार करुन त्यांच्या वर्गणीचा हिशोब व्यवस्थित व अद्ययावत ठेवणे.
७) संस्थेच्या नांवे वेळोवेळी येणा-या कोणत्याही रक्कमा, वर्गणी, देणग्या, प्रवेश शुल्क निधी, चिजवस्तु वगैरे स्विकारणे आणि त्याबाबत छापील अनुक्रमांकीत, संस्थेचा नोंदणी क्रमांक व कार्यालयाचा पत्ता असलेल्या पावत्या देणे.

## ड) सल्लागार-

१) संस्थेला आवश्यकतेनुसार सल्लागार मंडळाची नेमणूक करता येईल.
२) सल्लागार मंडळ कमीत कमी ३ व जास्तीत जास्त ५ जणांचे राहील. सल्लागार मंडळाला निवडणुकीत भाग घेण्याचा अथवा मतदान करण्याचा अधिकार राहणार नांही.
३) संस्थेकरीता धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार असणार नाही. सल्लागार मंडळाचे कार्य केवळ सल्ला/मार्गदर्शन करण्याचे राहील.
४) कार्यकारी मंडळाच्या/सर्वसाधारण सभेस उपस्थित राहून चर्चेत सहभागी होता येईल.
५) सल्लागाराचा कार्यकाल हा दोन वर्षाचा राहील. मात्र त्याच सल्लागाराला पुन्हा दोन वर्ष मुदतवाढ देता येईल. त्यांचे काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास त्यांना मुदतपुर्व कमी करण्याचे अधिकार संस्थेच्या कमिटीला किंवा मान.चेअरमन यांना राहील.

## इ) कार्यकारी सदस्य:-

१) सर्व कार्यकारी सदस्यांनी मान.चेअरमन यांच्या आदेशांचे पालन करावे, व सचिव यांना त्यांच्या कार्यात आवश्यकतेनुसार मदत करावी
२) सर्व सभांमध्ये उपस्थित राहणे.
३) संस्थेच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.
४) संस्थेस सुयोग्य निर्णय घेण्यास / योग्य निर्णय पारित करण्यांस मदत करणे.

चेअरमन | सचिव | खजिनदार

## १३) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये:-

१) संस्थेच्या सर्व कारभाराचे नियंत्रण व संचालन करणे.
२) संस्थेच्या सभांमध्ये पारित झालेल्या सर्व ठरावांची पूर्तता करणे.
३) संस्थेच्या स्थावर, जंगम मालमत्तेवर लक्ष ठेवणे, देखरेख करणे. तरोच त्यांची विहित नमुन्यात नोंद ठेवणे.
४) मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त/सहाय्यक संस्था निबंधक यांचेकडे विविध विवरणपत्रके, हिशोबपत्रके व रिपोर्ट विहीत वेळेत सादर करणे.
५) संस्थेच्या हितार्थ कोर्ट कचेरीचे कामकाज पाहणे, न्यायालयांत दावे दाखल करणे व संस्थेच्या हितामध्ये कामकाज करणे, जाहिरात देणे, संस्थेवर असलेल्या कायदेशीर बाबींची पूर्तता करणे.
६) संस्थेच्या हिताकरीता आवश्यक ते आदेश पारीत करणे व योग्य ती पुर्तता करणे. विविध सेवा-स्वहितासाठी करार करणे.
७) विविध रक्कमांची देवाणे-घेवाण करणे.
८) नियम व आवश्यकतेनुसार सुचना देऊन सभांचे आयोजन करणे.
९) संस्थेच्या हितासाठी आवश्यकतेनुसार नियम व नियमावलीच्या आणि उद्देशांच्या अधिन राहून नियम/पोटनियम तयार करणे. आवश्यकतेनुसार त्यात बदल करणे.
१०) तक्रारीची दखल घेणे, योग्य ते दिशा निर्देश देणे.
११) हिशोबांवर तसेच जमाखर्चाच्या नोंदीवर नियंत्रण ठेवणे.
१२) आवश्यकतेनुसार स्थानिक समिती, उपसमिती नेमणे व काम पूर्ण होताच त्या बरखास्त करणे.
१३) कार्यकारी मंडळातील रिक्तपद भरणेबाबत व कार्यकाल पूर्ण झाला असल्यास नियमानुसार तात्काळ कार्यवाही करणे. अचानक रिक्त झालेल्या पदांबाबत उरलेल्या कालावधीसाठी रिक्त पदे भरण्याबाबत नियमांनुसार तात्काळ कार्यवाही करणे.
१४) संस्थेच्या कामकाजांसाठी सेवकांची नियुक्ती करणे अथवा त्यांना रितसर काढून टाकणे.
१५) संस्थाहितार्थ बहुमताने विविध निर्णय घेणे.
१६) संस्थेला आवश्यकतेनुसार सल्लागार मंडळाची नेमणूक करता येईल.
१७) संस्थेच्या सेवेतील अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची सेवा नियुक्ती व सेवा शर्ती ठरविणे
१८) संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांची नेमणूक करणे, त्यांचे वेतन ठरविणे व त्यांचा कामाचा जॉब चार्ट ठरविणे
१९) संस्थेने विविध शैक्षणिक उपक्रम सुरु केले आहेत. अशा शैक्षणिक उपक्रमासाठी त्या त्या शिक्षणाच्या दर्जानुसार त्या त्या पात्रतेचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, सहशिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची आवश्यकतेनुसार नेमणूक करणे, वेतन ठरविणे व त्यांचा जॉब चार्ट ठरविणे. त्यांच्यासाठी सेवा शर्ती व नियमावली (सेवा नियम) तयार करुन त्यांची अंमलबजावणी करणे व ती लागू करणे.

## १४) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :-

कार्यकारी मंडळाची सभा दर तीन महिन्यातून एकदा आयोजित करण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या संमत्ती शिवाय ठोस कारण नसताना एखादा सदस्य सलग ३ सभांना गैरहजर राहिल्यास त्याला विहीत सूचना देऊन व त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी देण्यात येईल. त्यानंतर कार्यकारी मंडळ सदस्यत्व रदद करण्याबाबत पुढील निर्णय घेईल. कार्यकारी मंडळाची सभा नियम व नियमावली नुसार होत नसल्यास कार्यकारी मंडळातील १/३ सदस्यांनी स्वत: सहीनिशी मान. चेअरमन/सचिव यांचेकडे अर्ज करुन सभा भरविण्याची मागणी केली पाहिजे अथवा संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या २/३ सभासदांनी कार्यकारी मंडळाकडे लेखी मागणी केल्यास मान. चेअरमन यांनी सदर मागणी प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत कार्यकारी मंडळाची सभा घ्यावी असे बंधन राहिल. मान. चेअरमन यांनी अशी सभा बोलावली नाही तर सचिवाकडे पुन्हा अर्ज केल्यास सचिवाने सदर सभा आयोजित करावी या सभेला कार्यकारी मंडळाच्या सभेचे पुर्ण अधिकार असतील. सदर सभांच्या सूचनेमध्ये मागणीची सभा असे नमूद करणे आवश्यक आहे. कार्यकारी मंडळाची मागणीची सभा भरवून मागणी अर्जाप्रमाणे त्यावर निर्णय घेतला पाहिजे.

चेअरमन सचिव खजिनदार

## १५) कार्यकारी मंडळाची सभा व मागणी सभेची सूचना व गणसंख्या:-

कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना कार्यकारी मंडळाच्या सभेची/मागणी सभेची लेखी सूचना मान.चेअरमन/सचिव यांनी कमीत कमी सात दिवस अगोदर दयावी. सभेची सूचना व नोटीस हस्तेदेय/ रजिस्टर पोस्टाने/ ई-मेल/व्हॉट्सअप यापैकी कोणत्याही पध्दतीने पाठविले जाऊ शकते. तसेच सूचना ही कार्यालयाच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्यात येईल. सभेच्या सूचनामध्ये तारीख, वेळ व ठिकाण नमूद असेल. कार्यकारी मंडळाच्या सभेत गणसंख्या (कोरम) ३/५ सदस्यांची असेल गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास सदरील सभा त्यादिवशी त्याठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. तसेच सभेतील निर्णय बहुमताने घेण्यात येतील.

## १६) कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम :-

कार्यकारी मंडळाची निवड दर ५ वर्षांनी वरील नियम क्रमांक ४,६,१०,११ नुसार वार्षिक सर्वसाधारण अथवा विशेष सर्व -साधारण सभेत केली जाईल. कार्यकारी मंडळाच्या निवडीनंतर पहिल्या ७ दिवसांनंतर मान.चेअरमन यांच्या संमतीने कार्यकारी मंडळाची पहिली सभा घेण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या निवडीस मान्यता देऊन हे कार्यकारी मंडळ कामकाजास सुरुवात करेल. कार्यकारी मंडळातील पदाधिका-यांची निवडणूकीची पध्दत हात वर करुन, बहुमताने किंवा आवश्यक असल्यास गुप्तमतदान पध्दतीने केली जाईल.

## १७) कार्यकारी मंडळाचे रिक्तपद भरणेबाबत नियम :-

नियमावलीत नमूद केलेल्या कारणावरुन कार्यकारी मंडळातील रिक्त झालेली जागा भरावयची असल्यास त्यावाबताचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहिल. याबाबत वरील नियम क्रमांक ४,६,१०,११ विचारात घेण्यात येतील, नियोजित पदसंख्या पूर्ण करुन घेण्यात येईल व मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त सिंधुदुर्ग यांचेकडे त्यावावतचा वदल अर्ज मान्यतेस्तव दाखल करण्यात येईल.

## १८) संस्थेचा निधी मिळकत व विनियोग:-

संस्थेने स्विकारलेल्या उद्देशानुसार उद्देश पूर्तीसाठी संस्था विविध मार्गांनी निधी जमा करु शकेल. सभासद फी, वर्गणी, शासन निमशासकीय यंत्रणेकडील अनुदाने, बॅंक गुंतवणूक व्याज, प्रवेश फी, सभासद बिगर सभासद यांचेकडील देणगी दान, वक्षीस, व संस्थेने चालविलेले शैक्षणिक उपक्रम यांपासून विद्यार्थ्यांकडून मिळणारी शैक्षणिक व प्रवेश शुल्क शिवाय संस्थेच्या स्थावर/जंगम मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न हे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत असतील. संस्थेच्या उद्देशपूर्ततेसाठी व त्यासाठीच्या प्रशासनिक कामकाजासाठी त्याचा विनियोग करण्यात येईल. तसेच संस्थेच्या उददेशपूर्तीसाठी व हितासाठी स्थावर मिळक्त विकत घेणे, भाडयाने घेणे, इमारत बांधकाम करणे त्याचा उपयोग संस्थेने सुरु केलेले विविध उपक्रम यासाठी करणे किंवा आवश्यकतेनुसार भाडयाने देणे, हस्तांतरीत करणे व कराराने देण्याचा हक्क आहे. या सर्व मार्गांनी मिळविलेल्या उत्पन्नातून संस्थेन सुरु केलेले शैक्षणिक उपक्रम त्यासाठी नियुक्त केलेला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन, भविष्य निर्वाह निधी व इतर देय रक्कमा भागविण्यात येतील. तसेच संस्थेचा व्यवस्थापन खर्च, इमारत डागडुजी, इमारत बांधकाम खर्च, कराराने घेतलेल्या स्थावर / जंगम मालमत्तेचे भाडे यावर खर्च करण्यात येईल. या मिळकतीचा विनियोग संस्थेच्या हितासाठीच केला जाईल.

## १९) उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतुद :-

संस्थेच्या ज्ञापनामध्ये नमूद केलेल्या उद्देशांवर खर्च करण्याचा अधिकार अस्तित्वात असलेल्या कार्यकारी मंडळास राहील.

## २०) कर्जासंबंधी तरतुद :-

संस्थेला आवश्यक वाटल्यास कोणत्याही व्यक्ती / वित्तीय संस्थेकडून कर्ज घेण्यासाठी सर्वसाधारण सभेमध्ये ठराव बहुमताने मंजुर करावा लागेल.तदनुसार संस्थेस हात उसणवार रक्कमा/कर्ज घेता येईल, तारण/गहाण ठेवता येईल मात्र याबाबत मा. सहा/उप/सह/धर्मादाय आयुक्त यांची कायदयाप्रमाणे पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

चेअरमन | सचिव | खजिनदार

## २१) स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करण्याबाबतची तरतूद :-

संस्थेच्या हितासाठी व उददेश पूर्तीसाठी स्थावर मालमत्तेची खरेदी-विक्री करता येईल. सर्वसाधारण सभेमध्ये याबाबतचा ठराव बहुमताने पारित करुन त्याबाबत व्यवहार करता येईल. मात्र याबाबत आवश्यकतेनुसार मा. सहा/उप/सह/धर्मादाय आयुक्त यांची कायदयाप्रमाणे पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहिल.

## २२) बँक खाते :-

महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनीयम १९५० मधील कलम ३५ प्रमाणे संस्थेजवळ असलेल्या ठेवी, शिल्लक रक्कम भारताच्या रिजर्व्ह बँकेबाबत अधिनीयम १९३४ यात व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयीकृत/अनुसूचित बँकेमध्ये, डाक बचत बँकेत किंवा राज्य शासनाने त्या प्रयोजनासाठी मान्यता दिलेल्या सहकारी बँकेत ठेव म्हणून ठेवणे किंवा तो सरकारी रोख्यात गुंतविणे हे विश्वस्त मंडळास बंधनकारक असेल.

## २३) बँक खात्यावरील आर्थिक व्यवहार करण्याचे अधिकार-

१) संस्थेचे बँक खाते चेअरमन, खजिनदार व संस्थेचे मुख्य् कार्यकारी अधिकारी यांचे नावे राहील. व त्या बँक खात्याचे आर्थिक व्यवहार करण्याचे अधिकार हे संस्थेचे खजिनदार व संस्थेचे मुख्य् कार्यकारी अधिकारी या पैकी कोणीही एक व चेअरमन यांच्या संयुक्त सहीने राहील.

२) संस्थेच्या संलग्नीत महाविद्यालयांचे किंवा संस्थेच्या अधिपत्याखाली येणा-या सर्व उपक्रमांचे बँक खाते चेअरमन, प्राचार्य आणि संस्थेचे मुख्य् कार्यकारी अधिकारी यांच्या संयुक्त नावाने उघडण्यात येईल.

३) या खात्याचे आर्थिक व्यवहार करण्याचे अधिकार प्राचार्य व संस्थेचे मुख्य् कार्यकारी अधिकारी या पैकी कोणीही एक व चेअरमन अशा दोघांच्या नावाने राहील.

४) संस्थेचे शक्य तितके व्यवहार हे धनादेशाद्वारे करण्याचा प्रयत्न केला जाईल.

## २४) सभासद यादी :-

संस्थेच्या प्रत्येक प्रकारच्या सभासदांची यादी संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम १५ अन्वये तसेच संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील कलम १५ अन्वये अनुसूची '६' प्रमाणे ठेवण्यात येईल.

तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम ४ नुसार व सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमामधील नियम ८ नुसार दरवर्षी संस्थेमध्ये नोकरीस लागलेल्या व्यक्तींच्या नोकरी संबंधी अटींबाबतचे विवरण संबंधीत अनुसूची २ च्या नमुन्यांत मा. सहाय्यक संस्था निबंधक यांचे कार्यालयास पाठवावे.

## २५) ज्ञापन, नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतुद :

अ) संस्थेच्या विधानपत्रात (ज्ञापनामध्ये) फेरबदल, वाढ, घट, विस्तार, अथवा काही बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२ अ मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे करता येईल.

आ) संस्थेच्या नियम व नियमावलीत दुरुस्ती, बदल, फेरफार, वाढ, घट, विस्तार अथवा काही बदल करावयाचा झाल्यास वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मतदानाचा हक्क असलेल्या एकुण सभासद संख्येच्या बहुमताने तसा ठराव करावा लागेल. संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या तरतुदीचे पालन करुन आवश्यक बदल करता येतील.

## २६) संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल करण्याची तरतुदी :-

संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल, वाढ, घट, विस्तार,अथवा काही बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२ अ मध्ये असलेल्या तरतुदी प्रमाणे कार्यवाही करता येईल. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये हजर असणा-या सभासदांच्या बहुमताने संमत करावा लागेल.

चेअरमन　　　　सचिव　　　　खजिनदार

## २७) विसर्जन:-

जर काही कारणांमुळे संस्था बरखास्त् करावयाची झाली तर वरीलप्रमाणे सर्व सभासदांना १० दिवस अगोदर नोटीस देऊन कळविण्यात येईल. याबाबत सुध्दा सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या ३/५ गणसंख्येने तसा ठराव संमत करावा लागेल. संस्थेचे सर्व देणे-घेणे आर्थिक व्यवहार पूर्ण करावे लागतील. संस्थेची स्थावर-जंगम शिल्लक मालमत्ता समान उद्देश असलेल्या नोंदणीकृत संस्थेस हस्तांतरीत केली जाईल. (In the event of the dissolution of the Trust, the assets/funds of the Trust will be transferred only to some other Trust/Society/Non Profit organization/company having similar objectives). तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम १३ व १४ नुसार कार्यवाही पुर्ण करावी लागेल. सर्व कायदेशीर सोपस्कार पूर्ण झाल्यावर त्याप्रमाणे संस्थेचे कार्य बंद करता येईल अथवा संस्था विसर्जित करता येईल. ही संस्था एकदा कार्यरत झाल्यावर रद्द करता येत नाही त्याला अपरिवर्तनीय संस्था असे म्हणतात. संस्थेचे हस्तांतरीत झालेल्या मालमत्तेचे नियंत्रण आणि अधिकार संस्था नोंदणाऱ्याकडे राहत नाहीत आणि म्हणूनच ते बदलता येणार नाही.

## २८) <u>माहितीचा अधिकार :-</u>

संस्थेचे सचिव हे जनमाहिती अधिकारी व चेअरमन हे अपिलिय प्राधिकारी असतील.

## २९) <u>देणगी व देणी स्विकारणे :-</u>

सदर नियमाव्दारे संस्थेस सर्व कायद्यांच्या अंतर्गत बांधील राहून देश/विदेशातून देणगी स्विकारण्याचे स्वातंत्र्य राहील तसेच संस्थेस इतर संस्थाना देणगी देण्याचे अधिकार राहतील.

## ३०) <u>अपरिवर्तनीयता ( Irrevocability ) :-</u>

कोणत्याही एका व्यक्तीस संस्था रद्द करता येणार नाही. तसेच न्यासाच्या मालमत्तेचा ताबा अथवा नियंत्रण कोणाही एका व्यक्तीकडे राहणार नाही. यानुसार सदरचा न्यास हा अपरिवर्तनीय (Irrevocable) राहील.(The Trust is Irrevocable)

## ३१) <u>लाभार्थी (Beneficiaries) :-</u>

संस्थेच्या विविध उद्देश पुर्तीचा लाभ कोण्या एका विशिष्ट व्यक्तीसाठी नसून तो सामान्य जनतेसाठी दिला जाईल . (The beneficiaries are the section of the public and not specific individuals). त्यामध्ये कोणत्याही प्रकारे जात, पात, धर्म, वर्ण इत्यादींचा भेदभाव केला जाणार नाही.

## ३२) <u>हस्तांतरण (Transfer of Funds, Property of the Trust in the event of Dissolution) :-</u>

संस्थेची स्थावर/जंगम शिल्लक मालमत्ता समान उद्देश असलेल्या नोंदणीकृत संस्थेस हस्तांतरीत केली जाईल.

(In the event of the dissolution of the Trust, the assets/ funds of the Trust will be transferred only to same other Trust/Society/Non-profit organization/company having similar objectives).

## ३३) <u>संस्थेची स्थावर-जंगम मालमत्ता (Funds and Property of the Trust) :-</u>

संस्थेची स्थावर-जंगम मालमत्ता ही संस्थेच्याच कार्यासाठी व उद्देशासाठी वापरली जाईल. (The funds/property of the trust will be used only for the objectives of the Trust)

Gelvankar
चेअरमन

सचिव

खरी प्रत
Deshmukh
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सिंधुदुर्ग विभाग, सिंधुदुर्ग

नक्कलनीस
G.K.Kadam
कलि 26/10/2023